# मेट्रो-३चे डबे मेक इन इंडियामध्येच

## ■ मुंबई मेट्रोतर्फे कंत्राटदारांची निवड

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) गुरूवारी मेट्रो-३ डब्बे बनवण्याचे कंत्राट निविदा प्रक्रियेनुसार ऑलस्टोम ट्रान्सपोर्ट इंडिया लि. आणि ऑलस्टोम ट्रान्सपोर्ट एस.ए. फ्रांस संयुक्त या कंपनीला डबे बनवण्याचं कंत्राट देण्यात आले आहे.त्यामुळे भारतातच मेट्रो-३ च्या २४८ डब्यांची निर्मिती होणार असल्याची माहिती एमएमआरसीने दिली. खरेदी प्रक्रियेच्या कायदेशीर नियम अटींची योग्यप्रकारे पूर्तता करून जायकाची मान्यता मिळाल्यानंतर हे कंत्राट देण्यात आले.

डिझाईन, निर्मिती, पुरवठा, मांडणी, चाचणी आणि प्रकल्पाची प्रत्यक्ष सुरूवात या कामांचा कंत्राटात समावेश असून ८ डब्यांच्या ३१ ट्रेन अशी रचना आहे. १८० मीटर लांबी असलेल्या डब्याची क्षमता ३०० प्रवासे प्रति डब्बा आण्ड पूर्ण ट्रेनची एकूण क्षमता २ हजार३५० प्रवाशांची आहे. आरामदायी आसानव्यवस्था ही या डब्ब्याची खासियत आहे. ट्रेन २५ केव्ही एसी ट्रॅक्शन विद्युत पुरवठ्यावर कार्यरत होणार आहे. प्रत्येक बाजूला ४ दरवाजे अशी व्यवस्था असून डब्बे स्टेनलेस स्टील धातूचे आहेत.

### डब्यांची इतर वैशिष्ट्ये

- ■ २५ केव्ही एसी ट्रॅक्शन विद्युत पुरवठा
- ■ प्रत्येक बाजूला ४ दरवाजे
- ■ स्टेनलेस स्टीलचे डबे
- ■ एलईडी प्रकाश योजना
- ■ मेट्रो गाडीची कालमर्यादा ३५ वर्षे
- ■ उत्तम वेग नियंत्रण
- ■ वीज बचत करणारी मेट्रो गाडी
- ■ संपूर्ण वातानुकूलित
- ■ प्रवाशांच्या माहितीसाठी डिजिटल मार्ग नकाशा डब्यात असेल
- ■ मदत केंद्र



या निविदेला कंपन्यांनी चांगला प्रतिसाद दिला होता. त्यानुसार गुरूवारी निविदा अंतिम करत एमएमआरसीने ऑलस्टोमला कंत्राट दिले आहे. मेट्रो-३ ला आर्थिक सहाय्य करणाऱ्या जायकाची मान्यता मिळाल्यानंतरच हे कंत्राट अंतिम करण्यात आल्याचेही एमएमआरसीने स्पष्ट केले आहे. महत्त्वाचे म्हणजे निविदा प्रक्रियेत फ्रान्सशी भागीदारी असलेल्या भारतातील ऑलस्टोम कंपनीने बाजी मारल्याने आता मेट्रो-३ च्या डब्यांची निर्मिती भारतातच होणार आहे. सध्या देशभर मेक इन इंडियाचे वारे असताना मेट्रो-३ चे डबेही भारतात तयार होणार असल्याने हे महत्त्वाचे मानल जात आहे.